## विषयसूचीतील क्रमांक ३

## दादा दळवी यांच्याकडून प.पू. भक्तराज महाराजांच्या भजनांचे भावार्थ लिहिण्याची घडलेली मोठी समष्टी सेवा !


डॉ. जयंत आठवले

'मी मुंबईला रहात असतांना मध्ये मध्ये चंद्रकांत रामकृष्ण दळवी (दादा दळवी) यांच्याकडे जात असे. तेव्हा ते नेहमी प.पू. भक्तराज महाराज (प.पू. बाबा) यांच्या भजनांचे भावार्थ लिहिण्यात मग्न असत. मला वाटायचे, 'यात वेळ घालवण्यापेक्षा ते नामजप का करत नाहीत ?' आता माझ्या लक्षात आले की, नामजपाने त्यांची केवळ व्यष्टी साधना झाली असती. त्यांनी प.पू. बाबांच्या भजनांचे भावार्थ लिहिल्यामुळे भजनांच्या अभ्यासकांना भजनांचा खरा अर्थ समजण्यास आणि त्यामुळे त्यांची साधनेत प्रगती होण्यास साहाय्य होईल. भजनांचे भावार्थ लिहिण्याने दादा दळवी यांची समष्टी साधनाही झाली आणि त्या साधनेमुळे त्यांना साधनेच्या पुढच्या टप्प्याला लवकर जाता आले.

दादांचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी प.पू. बाबांकडून भजनांचे भावार्थ केवळ समजूनच घेतले नाहीत, तर त्या भावार्थांच्या आशयामध्ये स्वतःच्या लिखाणाची भर घालून, ते सूत्रबद्ध करून, सुगम अन् ओघवत्या भाषेतही लिहिले. त्यांनी प.पू. बाबांच्या प्रत्येक भजनाचे केलेले विश्लेषण मला अतिशय आवडते. मला भजनांचा अर्थ आता खऱ्या अर्थाने कळायला लागला. याविषयी मी दादांप्रती कृतज्ञ आहे.

हे सर्व भजन-भावार्थ भक्तीयोग, कर्मयोग, ज्ञानयोग, गुरुकृपेसाठी करायची साधना इत्यादींविषयी अनमोल मार्गदर्शन करणारे आहेत. अशा प्रकारे 'प.पू. भक्तराज महाराज यांची भजने आणि त्यांचे भावार्थ' यांची ग्रंथमालिका सिद्ध झाली असून प्रस्तुत ग्रंथ हा या मालिकेतील दुसरा भाग आहे.

'प.पू. बाबांच्या कृपेमुळेच आम्हा भक्तांकडून या ग्रंथाच्या प्रसिद्धीचे

कार्य पूर्ण होऊ शकले', याविषयी प.पू. बाबांच्या चरणी भावपूर्ण कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या चरणी हा ग्रंथ अर्पण करतो.'

**– डॉ. जयंत बाळाजी आठवले, प.पू. भक्तराज महाराज यांचा शिष्य (३.४.२०२२)** F (DrV-Sh + BMBh-Bha-DD2 + DW-BMBh-Bha-DD + PR 3VSS)

---

## डॉ. जयंत आठवले यांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय

१. आंतरराष्ट्रीय स्तराचे संमोहन-उपचारतज्ञ (वर्ष १९७८ ते वर्ष १९९५)

२. प.पू. भक्तराज महाराज यांच्या आशीर्वादाने अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

४. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून १.४.२०२२ पर्यंत १२० साधक संत झाले, तर १,११९ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू.

५. प.पू. भक्तराज महाराज यांनी प्रत्यक्ष दिलेल्या कृपाशीर्वादाचे फलित म्हणून देवता, साधना, आचारधर्मपालन, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती आणि ग्रंथ-प्रकाशन

६. 'ईश्वरप्राप्तीसाठी कला' व कलेचे सात्त्विक सादरीकरण यांविषयी संशोधन

७. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींचे त्रास यांवर उपयुक्त असणाऱ्या विविध उपायपद्धतींविषयी संशोधन

८. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

९. प्रखर हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

१०. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

(संपूर्ण परिचयासाठी पहा – सनातनचे संकेतस्थळ 'www.Sanatan.org')

# भजनांची अनुक्रमणिका

प्रस्तुत ग्रंथमालिकेच्या पहिल्या भागात १ ते २७ भजने समाविष्ट केली असून या भागात २८ ते ७० पर्यंतची भजने समाविष्ट केली आहेत.


| | | |
|---|---|---|
| २८. | गळा बांधिला हा संसार । | १८ |
| २९. | गुरुचरणाचा ध्यास । | २१ |
| ३०. | गुरुचरणी ठेवी ध्यास । | २४ |
| ३१. | गुरु भक्तीदाता माय ताता । | २६ |
| ३२. | गुरु महाराजा गुरु । | ३० |
| ३३. | गोकुळात नांदे हरि । | ३३ |
| ३४. | चला जाऊ नाथ सदनाला । | ३४ |
| ३५. | चला जाऊया जाऊ या हो चला जाऊया जाऊ या । | ३६ |
| ३६. | चंद्राची कला चांदणी । | ३९ |
| ३७. | जमले अवघे भक्तजन । | ४१ |
| ३८. | जय जय जय जय जय साईनाथा । | ४३ |
| ३९. | जाग जिवा जाग आता । | ४५ |
| ४०. | झणी घेई धाव गुरुराया । | ४७ |
| ४१. | झणी धाव आता धाव प्रभु गुरुनाथा । | ५० |
| ४२. | झणी धावत या गुरुराया । | ५५ |
| ४३. | झोपू नका कुणी झोपू नका । | ५७ |
| ४४. | त्रैलोक्याचे योगीराज हे अवतरले भूवरी । | ५९ |
| ४५. | दयेच्या सागर नाथा । | ६१ |
| ४६. | दिना विनवी हो भक्तांसी । | ६४ |
| ४७. | दीनवत्सल दीनबंधू तू । | ६६ |

| | |
|---|---|
| भजने आणि त्यांचे भावार्थ (भाग २) | १७ |
| ४८. दीनानाथ माझा नाथ । | ७० |
| ४९. दुःखाचे जे मूळ सुखासी कारण । | ७२ |
| ५०. देवा तुझेच मी लेकरू । | ७६ |
| ५१. देवा तुझ्या दारी आलो । | ८० |
| ५२. देवादिक मिळविले रसातळी । | ८२ |
| ५३. देवा माझ्या सोडवी या यातना । | ८५ |
| ५४. देहा रंगी रे मना रंगी रे । | ८७ |
| ५५. द्वारकेच्या नाथा द्या दर्शन आम्हा वेगी । | ९१ |
| ५६. धावत ये केशवा । | ९३ |
| ५७. धाव पाव रे साईशा । | ९६ |
| ५८. धाव रे धाव गुरुनाथा । | ९८ |
| ५९. नको रे जिणे नको रे बापा । | १०१ |
| ६०. नाथा कोठे रे लपलासी । | १०५ |
| ६१. नेत्री सदा रूप श्रींचे । | १०८ |
| ६२. पतितपावन नाम ऐकूनी । | ११० |
| ६३. परब्रह्म एक नाम तुझे देवा । | ११३ |
| ६४. पान्हावले नेत्र । | ११५ |
| ६५. प्रभु आमुचे साईनाथ । | ११७ |
| ६६. प्रभु या माया बाजारी । | ११९ |
| ६७. प्रशांत चंद्र हा उगवी गगना । | १२३ |
| ६८. बघ एक दिवस येणार । | १२५ |
| ६९. बाप माझा हो ज्ञानवंत । | १२८ |
| ७०. बोलवितो मज । | १३२ |